<u>तक्रार यु.एल.पी. २३/२०२०</u> <u>नि. सी–४</u>

<u>सरतपासणी श्री यु.व्ही. देशपांडे, अधिवक्ता प्रतिवादी तर्फे:–</u>

०४. मी माझे पुराव्यात दाखल केलेले शपथपत्र तेच असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे व तो निशाणी सी–४ वर आहे.

<u>उलटतपासणी श्री एम.एम. वानखडे, अधिवक्ता, तक्रारकर्ता तर्फे :</u>

०५. मी तपासणी पथकात पाच वर्ष काम केलेले आहे. तपासणी दरम्यान विनातिकीट आढळून आलेल्या प्रवाशांना मशिनमधुन तिकीट देउन ती तपासणी दरम्यान जप्त करावी लागते हे मला माहित आहे. तपासणीदरम्यान तपासणीपुर्वीचा इन्स्पेक्शन रिपोर्ट व तपासणीनंतरचा इन्स्पेक्शन रिपोर्ट काढावा लागतो हे मला माहित आहे. मी हस्तलिखीत तिकीट जप्त केलेले आहे परंतु कथित विनातिकीट प्रवाशांना तपासणी दरम्यान दिलेले तिकीट जप्त करून अभिलेखावर दाखल केले नाही तसेच तपासणी नंतरचा रिपोर्ट अभिलेखावर दाखल केला नाही. इन्स्पेक्शन रिपोर्ट पाहुन सांगतो की, त्या रिपार्ट मध्ये तपासणीवेळी बसमध्ये किती प्रवाशी प्रवास करत होते हे दिसुन येत नाही. तपासणी दरम्यान इन्स्पेक्शन रिपोर्ट काढण्यासाठी वापरलेली ईटीआय मशिन ही त्या बसमधील वाहक वापरत असलेलीच मशिन होती. हे म्हणने खरे आहे की, तपासणी दरम्यान तक्रारकर्ता हीने त्या मशिन मधुन तिकीट निघत नसल्याचे सांगितले होते. मला आता तक्रारकर्ता हिचे मी नोंदविलेले बयाण दाखविले ते मी नोंदविलेले असुन त्यावर माझी सही आहे. त्या बयाणातील मजकुर अ व ब हे मी तक्रारकर्ता हिच्या सांगण्यानुसार नोंदविलेला आहे. त्यास **<u>नि.क्र. सी–५</u>** देण्यात येत आहे. विनातिकीट प्रवाशांचे बयाण त्यांच्या हस्ताक्षरात नोंदविणे गरजेचे आहे. कुंदाबाई व कुंडलिक या प्रवाशांनी त्यांचे बयाण स्वत: लिहिले. सदरील बयाण पाहुन सांगतो हे दोन्ही बयाण दुस–या व्यक्तीने लिहिलेले आहे ते बयाण लिहिणा–या व्यक्तीचे नांव बयाणात नमुद नाही. हे म्हणने खरे नाही की, प्रवाशांचे बयाण आम्ही लिहिलेले असुन त्यावर फक्त प्रवाशांची सही घेतलेली आहे. येरखडा येथे उतरणारा विनातिकीट प्रवाशांपैकी फक्त

<u>तक्रार यु.एल.पी. २३/२०२०</u> <u>नि. सी—४</u>

एक प्रवाशी होता. हे म्हणने खरे नाही की, भिसी ते येरखडा यातील अंतर ६ कि. मी. इतके आहे. भिसी ते येरखडा यातील अंतर दाखविणारे दस्ताऐवज मी अभिलेखावर दाखल केले नाही. वाहकाची रा.प. रोकड ८५ रूपयांनी कमी आढळली. हे म्हणने खरे नाही की, या प्रकरणात वाहकाकडुन कोणतीही अनियमितता झाली नाही. हे म्हणने खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पूर्ण झाला.
फेर तपास काही नाही.

श्रवणोत्तरी स्वीकृत

स्वा/—
(रविकांत तु. साखरे)
सदस्य,
दिनांक १२/०९/२०२५ औद्योगिक न्यायालय, चंद्रपूर.